श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी), मुंबई येथे लेखापरिक्षक नियुक्ती बाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन आदेश क्र.एसव्हीटी १११९/३९८/प्र.क्र. ८५/का.१६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २४ जुन २०१९

<u>संदर्भ :-</u> प्रभारी कार्यकारी अधिकारी, श्रीसिध्दीविनायक गणपती मंदिर न्यास यांचे पत्र क्र. सिविगमं/४५ /२०१९, दि.११.०४.२०१९.

<u>शासन आदेश</u>

श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी), अधिनियम, १९८० च्या कलम १६ (२) (क) मधील तरतुदीनुसार श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) यांचे सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी मे.शिंदे चव्हाण, गांधी आणि कंपनी, लातूर यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

२. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) या न्यासाचे सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी मे.शिंदे चव्हाण, गांधी आणि कंपनी, लातूर यांची निविदा रक्कम रू.२२,२००/- (अक्षरात बावीस हजार दोनशे फक्त) इतकी फी श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, (प्रभादेवी) यांच्याकडून अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाचा www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२४१७१०५६१२१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Salunke Sunita Parag
Date: 2019.06.24 17:18:57 +05'30'

(सु.प.साळुंके)
कार्यासन अधिकारी, विधि व न्याय विभाग.

प्रति ,

मे.शिंदे चव्हाण, गांधी आणि कंपनी,बाप्पाजी, २ रा मजला, गौरक्षण संस्था, स्टेट बँक ऑफ इंडीया वर, मेन रोड, लातूर-४१३५१२.

प्रत :-

१. अध्यक्ष, श्रीसिध्दीविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी), व्यवस्थापन समिती, मुंबई.
२. सर्व सदस्य (कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत) श्रीसिध्दीविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी), व्यवस्थापन समिती,मुंबई.
३. कार्यकारी अधिकारी, श्रीसिध्दीविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी),मुंबई.
४. निवड नस्ती/का-१६.